REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# ‘माचीवरला बुधा’ एक समर्थ प्रादेशिक कादंबरी

**डॉ.राजेंद्र ज. देवरे**
डॉ.बी.एन.पी. कला,श्रीमती एस.जी. गुप्ता वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोणावळा.


गोपाळ नीळकंठ दांडेकर अर्थात अप्पा हे मराठी साहित्यातले वैशिष्ट्यपूर्ण कादंबरीकार म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांचा जन्म ०८ जुलै १९१६. गो.नी. दांडेकर यांचे मूळगाव परतवाडा(अमरावती). वयाच्या तेराव्या चौदाव्या वर्षी ‘एका वर्षात स्वराज्य’ या घोषणेच्या आकर्षणामुळे १९३०ला घरातून पलायन केले. परंतु घोषणेतला फोलपणा लक्षात न आल्याने घरी न परतता संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत राहिले. पडेल ती कामे केली. वृत्तपत्रे विकली, कुंड्यांसाठी माती आणून दिली, चित्रपट कंपनीत कामे केली, रस्त्यावर आकाशाखाली रात्री काढल्या. संत गाडगेबाबांबरोबर राहिले. कीर्तने केली. संत साहित्याचा (तुकाराम गाथा– ज्ञानेश्वरी) अभ्यास केला. दुर्ग–गड भ्रमंती केली. एकूनच आयुष्यात भ्रमंती केल्याने कोकणातली, मावळातली माणसे, निसर्ग जवळून पाहिली. अनुभवविश्व समृद्ध असल्याने त्यांच्या साहित्याला जिवंतपणा, वास्तवता प्राप्त होते.

प्रस्तुत शोधनिबंधात दांडेकरांची ‘माचीवरला बुधा’ या प्रादेशिक कादंबरीचा आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.

गो.नी. दांडेकरांनी ‘पडघवली’, ‘माचीवरला बुधा’, ‘जैत रे जैत’, ‘रानभुली’, ‘वाघरू’, ‘मृण्मयी’, ‘शितू’, ‘पवनाकाठचा धोंडी’, ‘पूर्णामायेची लेकरू’, ‘तांबडफुटी’ इत्यादी प्रादेशिक कादंबऱ्यांचे लेखन करून कादंबरी वाङ्मयाचे दालन समृद्ध केले आहे.

खरेतर प्रादेशिक, ग्रामीण, राजकीय, ऐतिहासिक, चरित्रात्मक, दलित, स्त्रीवादी, जनवादी, पौराणिक इत्यादी वर्गवारी अभ्यासकांनी सोयीसाठी केली आहे. मराठी कादंबरीत प्रादेशिक कादंबरीचे एक स्वतंत्र दालन निर्माण झाले आहे. प्रादेशिक कादंबरीसंदर्भात मदन कुलकर्णी म्हणतात, ‘‘विशिष्ट भूप्रदेशाचे, तेथे वास्तव्य करणाऱ्या लोकजीवनाचे, भूगोल व निसर्ग यासह सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टयांचे सामूहिक रूपाने चित्रण करणाऱ्या, त्या लोक समाजाच्या समस्या, चालीरीती, रूढी परंपरा, उत्सव, अंधश्रद्धा, भूतप्रेतविषयी कल्पना, देवदेवस्की आणि अन्य लोकसंस्कृतीचे तत्त्वे इत्यादींचे नवल जागृतीचे स्थानिक बोलीभाषेद्वारे अथवा प्रमाण भाषेद्वारे आंशिक स्वरूपाने वास्तवपूर्ण चित्रण करणाऱ्या कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल.’’ (‘समकालीन साहित्य: प्रवृत्ती आणि प्रवाह’, (संपा.) मृणालिनी पाटील, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९८५, पृ.२५४) प्रादेशिक कादंबरी व ग्रामीण कादंबरी यांच्यातला फरकही या संदर्भात लक्षात घेतल्यास प्रादेशिकतेचा व्याप मोठा आहे, असे लक्षात येते.

र.वा. दिघे, गो.नी.दांडेकर, श्री.ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, चि.त्र्यं. खानविलकर, अण्णाभाऊ साठे, रा.र. बोराडे, उद्धव शेळके, रणजीत देसाई इत्यादींनी प्रादेशिक कादंबरी लेखन केले आहे.परंतु प्रादेशिक कादंबरीच्या नव्या पर्वाचा प्रारंभ दांडेकर, पेंडसे यांनी केला. ‘पवनाकाठचा धोंडी’, ‘रानभुली’, ‘पूर्णामायेची लेकरं’, ‘माचीवरला बुधा’, ‘जैत रे जैत’ इत्यादी कादंबऱ्यांमधून महाराष्ट्रातल्या विविध प्रदेशांचा परिचय होतो.



गो.नी. दांडेकरांच्या ‘माचीवरला बुधा’ या कादंबरीचा अभ्यास केल्यावर प्रादेशिकतेचा उत्कट अनुभव येतो. लोणावळ्याजवळच्या राजमाची किल्ल्याच्या परिसरात या कादंबरीचे कथानक घडते. मावळातला निसर्ग, निसर्गावर प्रेम

करणार्या परिसरात भेटतात. गो.नी. दांडेकरांनाही भ्रमंतीची आवड होती. विविध प्रदेशात जाऊन, प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यावर लेखन करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळेच या भ्रमंतीत त्यांना माचीवरला बुधा भेटतो. निसर्गावर, प्राण्यांवर, झाडांवर प्रेम करणारा बुधाजी उंबरे (कादंबरीत बुधाजी चऱ्हाटे) त्यांना भावतो. त्यामुळे 'माचीवरला बुधा' (१९५८) ही कादंबरी त्यांनी प्रकाशित केली. दांडेकरांनी रेखाटलेल्या बुधाच्या घरी, त्यांच्या रानात, राजमाची परिसरात दांडेकरांनी वास्तव्य केले होते. त्यामुळे कादंबरी वाचल्यानंतर व राजमाची परिसराला भेट दिल्यानंतर त्यांच्या कादंबरीतला निसर्ग प्रत्यक्षात अनुभवाला येतो.

**कथानक:**

या कादंबरीचे कथानक लोणावळ्याच्या परिसरात असलेल्या राजमाची किल्ल्याच्या परिसरात घडते. राजमाची किल्ल्यावर टाके आणि तळे दुरुस्त ठेवून त्याची राखण करण्याचे काम चऱ्हाटे कुटुंबाकडे होते. परंतु कालांतराने या कुटुंबाकडे हे काम राहात नाही. जगण्याचे साधन न राहिल्यामुळे चऱ्हाटे कुटुंब-बुधाचे वडील मुलाबाळांसह मुंबईला जातो. लहानपणी राजमाचीवर प्रेम करणारा बुधाही बरीच वर्षे मुंबईत राहतो. गोदीत आणि नंतर भायखळा स्टेशनवर हमाल म्हणून काही काळ घालवला. बुधाच्या मुलाला भिवाला नोकरी लागते. डोळ्यात फुल पडल्याने नजर कमी झालेला बुधा घरीच राहतो.म्हातारा झालेला बुधा शहरी जीवनाला कंटाळतो. शहरात घुसमट होत असल्याने बुधा आपल्या गावी परत जाण्याचा निर्णय घेतो. मुंबईहून राजमाचीच्या दिशेने प्रवासापासून या कादंबरीच्या कथानकाला सुरुवात होते.

'बुधा' हा या कादंबरीचा नायक आहे. मुंबईतल्या धकाधकीच्या जीवनात त्याला गावाकडची सारखी आठवण यायची. त्यातच डोळ्यात फुल पडल्याने, कोणतेही काम नसल्याने अस्वस्थ झालेला बुधा आजारी असल्याचे शेजाऱ्यांच्या लक्षात येते. परंतु हे आजारपण मानसिक होते. दवाखान्यात नेण्याच्या निर्णयाच्या वेळी तो म्हणतो, ''मला माचीला जायचं, तिथे आवडीच्या सावलीत, कड्याच्या पोटाशी, उंबराच्या शितळाईत, वाडवडिलांच्या मिराशीत गेल्याबिगर माजं दुःख दूर हुयाचं न्हाई.'' असे तो मुलाला सांगतो.

बुधा मुंबईहून रेल्वेने प्रवासाला सुरुवात करतो. खंडाळ्याच्या घाटातून दिसणाऱ्या राजमाचीच्या बालेकिल्ल्याकडे पाहून हरखून जातो. लोणावळ्याला पोहोचल्यावर मुंबई-पुणे रस्ता ओलांडून तुंगारली गावात शिरतो. रस्त्यात भेटलेल्या बोंबले नावाच्या व्यक्तीला समदं ठीक आहे ना? असे विचारतो.

समदं म्हणजे काय? असा प्रश्न पडल्यावर 'ट्येमलाईचं पठार, श्रीवर्धन, मनरेंजन इत्यादी' असे स्पष्टीकरण बुधा देतो. बोंबलेला हे विचारण्यामागचा अर्थ कळत नाही. बुधा ट्येमलाई पठारावर असणाऱ्या प्रेमामुळेच त्याची चौकशी तो करतो.''ट्येमलाइचं पठार, ती आमची जिमीन, बापजाद्यांनी पिकवली, म्यानासवली तिची कदर केली नाही. पर आता पुन्हा आसऱ्याला, उंबराच्या सावलीत शिरीवर्धनकडे द्रीष्टी लावून संपवण्याचा मनोदय बुधा व्यक्त करतो.रस्त्याने जाताना गाडीरस्ता सोडून पायवाटेने जेवढे लवकर राजमाचीच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करतो. रस्त्यांनी भेटलेल्या मुलांची चौकशी करतो.

माचीला पोहचल्यावर ठाकरांच्या मदतीने झोपडी बांधतो. स्वतःच्या शेताची झालेली अवस्था पाहून अस्वस्थ होतो. ठाकरांनी दिलेल्या औषधांमुळे त्याला दिसू लागते. हळूहळू बुधा स्थिर होतो. पठारावरच्या वनस्पती, वृक्ष, पाखरे, प्राणी, पक्षी त्याच्या जीवनात प्रवेश करू लागतात. त्याच्याशी बुधा एकरूप होतो.त्याही त्याच्याशी बोलू लागतात.हा निसर्ग त्याच्या जिवनाचा अविभाज्य घटक बनतो. त्यांच्याशिवाय तो राहूच शकत नाही. मुंबईच्या जीवनात बुधानी विमान पाहिलेले असले तरी माचीवरून दररोज जाणारे विमान दिसले नाही तर तो अस्वस्थ होतो.

राजमाचीच्या कड्याच्या ऐन तोंडाशी कड्याच्या खालच्या अंगाला वाकून उभी असलेली नांदूरकीचे झाडावर बसून झोका घेण्याचे तो सुख अनुभवतो. तळकोकणाकडे बघत तासनतास घालवतो.संवाद साधतो. माणसांपासून दूर राहूनही माणसांविषयीचे सुप्त आकर्षण बुधाच्या मनात असते. म्हणूनच कड्याच्या खाली १५०० फूट खोल सैन्याचा कॅम्प आलेला असतो. त्यांच्याशी आपले पाहुणे म्हणून दुरवरुनच एकतर्फी बोलतो.

बुधा हा ह्या निसर्गात अलौकिक पातळीवर जगतो. तो निसर्गाशी इतका एकरूप झाला आहे की, राजमाची सोडून जाणे त्याला पटत नाही, कारण त्याचे मन आवडीवर, कुत्र्यांवर, तळकोकणावर, झोपडीत आलेल्या खारीवर जडलेले आहे. खार त्याच्या झोपडीत प्रवेश करते. तिला तांदूळ खायला घालतो.तांदूळ टाकणे परवडणार नाही म्हणून नागलीची भाकरी खायला घालतो.हा व्यावहारिक दृष्टीकोनही लक्षात घेण्यासारखा आहे. कुत्र्याची सोबत होईल म्हणून कुत्र्याचे पिल्लू पाळतो. नंतर त्याच्याच प्रेमात पडतो. त्याच्याशी बोलतो, कुत्र्याला जेव्हा बिबट्याने फाडून खाल्ले तेव्हा तो स्वतःलाच जबाबदार धरतो. त्याने पाळलेल्या बकरीच्या गळ्यात मान लपवून तो म्हणतो, ''बाये, कुत्रा म्येला. म्या चांडाळानं त्याला मारला.'' असे म्हणून दुःखी-कष्टी होतो.कुत्र्याने बिबट्या आल्याची सूचना दिली होती परंतु दिवसभराच्या अस्वस्थेमुळे त्याने त्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळेच

माझ्यामुळेच कुत्रा मेला, असे त्याला शेवटपर्यंत वाटत राहते. 'कुत्रा ज्या मातीत झोपला त्याच मातीत आपणही संपवावे' असा विचार बुधा करतो. कुत्र्याच्या जाण्याने बुधा दिवसेंदिवस खचत जातो.

### बुधाचा गोतावळा:

बुधाने सर्व गोतावळा जमा केला होता. ह्या गोतावळ्याची नावे सुद्धा आपलेपणा व्यक्त करतात. आवळीबाई, घागरबाई, उंबरबाबा, खारूताई, बकरी, म्हैस इत्यादी गोतावळा किती चांगला आहे, हे बुधा त्याच्या मुलाला (भिव्याला) सांगतो. ''भिव्या आरं तू मला म्हणालास का बिरान्या गावचा गोतावळा गोळा केला, ल्येकरा हायत खरचं पर असं बघ, का घागरताई आणि उंबरबाबा दोघबी कधी धडूत मागाया येत न्हाईत, का ज्यावाय दिलं नही म्हणून रुसत नाहीत. उंबरबाबा आपली शितळ सावली मातर रातदीस झोपडीवर धरून हुबा हाये. असा बंदुराजा कुठं मिळल का? मुंबईच्या माणसांना काय करीतोस. आरं कुणीबी कामाला यायचा न्हाई. पैका हाय तवर समदे बुधाला करत्यात. त्यो संपलाबरोबर कुणी वळख बी दावायचं न्हाई.'' असे मुंबईची माणसं आणि माचीच्या निसर्गाचे संबंध तो स्पष्ट करतो.

निसर्गातल्या साऱ्याच गोष्टींवर त्याचे प्रेम आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातली सरडा, प्राणी, झाडे यांच्याशी बुधा एकटाच बोलत असल्याने त्याला मुंजाबाचा अंश समजला जातो. या संदर्भातली बोबले नावाच्या व्यक्तीची प्रतिक्रिया महत्त्वाची वाटते. जेव्हा तो जखमी सरड्याला वाचवतो, वाचवताना त्याच्याशी बोलतो, त्यामुळे त्याची चेष्टा केली जाते. त्यावेळी बोबले म्हणतो, ''अशी चेष्टा करू न्हाई. तो मुंजाबाबाचं झाड हाये!'' मुजाबा वंश असल्यानेच एकटाच जंगलात राहतो, असे बोंबले सांगतो.

### बुधाची निसर्गाशी, मातीशी असलेली एकरूपता:

मुलगा जेव्हा बुधाला घ्यायला येतो तेव्हा तो परत जाण्यास नकार देतो. कारण याच रहाळात त्याचे बापजादे राहिले होते. तेथेच खाचरात खपले होते.उन्हाने पोळले होते.वाऱ्याच्या झुळकांनी सुखावले होते. पावसाने भिजले होते. थंडीने काकडले होते. काकडता काकडता ते म्हातारे झाले होते. इथचं कुठे तरी त्यांची मुठभर राख झाली. इथं इथल्याच आभाळात ती उडून मिसळली होती. त्या त्यांच्या राहण्याचा, पोळण्याचा, भिजण्याचा, काकडण्याचा, ऊन-राखेचा जणू सुगंधच सुटला होता. बुधालाही तो जाणवू लागला. याच्या सहवासाने बुधा अमर होणार होता... त्याचाही सुवास तो मेल्यावर सुटणार होता. धरती बुडाली तरी तो राहणार होता...म्हणूनच तो भिवाबरोबर जाण्यास नकार देतो.

### बुधाच्या आयुष्यातील एकटेपण:

बुधाचे एकटेपण वाढत चालले होते.म्हशीला वाचवण्याच्या प्रयत्नांमुळे त्याच्या शरीराला जखमा होतात. त्यामुळे त्याचे सारे व्यवहार थंडावतात. मनावर आणि शरीरावर झालेल्या जखमांनी बुधा अंतर्बाह्य व्यथित होतो. त्याला ताप भरतो.भुताने झपाटल्यासारखा पडून राहतो.

बुधा यंत्रवत होत चालला होता. सगळी कामे तो करीत होता. सृष्टी त्याच्याशी एकरूप झाली होती. परंतु तो एकरूप होत नव्हता. आपल्याला काय होतंय हे त्याला नेमकं कळत नव्हतं. पण काही तरी त्याचे हरवले आहे असे त्याला वाटते...

### बुधाचा शेवट:

बुधाला एके दिवशी वनचर आल्याचा भास होतो. निसर्गाच्या सानिध्यात आल्याने त्याला वनचर भेटायला येईल, असा भास होतो. व शेवटी शांतपणे मरतो. शेवटी बुधा निसर्गात विलीन होतो. परंतु वाचकांच्या मनातून जात नाही. दांडेकरांनी बुधा ही व्यक्तिरेखा जिवंत केली आहे. बुधाची व्यक्तिरेखा रेखाटताना राजमाचीचा प्रदेश जिवंत केला आहे. बुधाला जसे एक व्यक्तिमत्त्व लाभले तसे व्यक्तिमत्त्व प्रदेशाला, निसर्गाला लाभले. रंजनवादी चौकट नाकारून ललितकृतीचे स्वरूप या कादंबरीला मिळवून दिले आहे.

मराठी प्रादेशिक कादंबरीत 'माचीवरला बुधा' ही कादंबरी आपल्या वैशिष्ट्यामुळे वेगळी आहे. 'निसर्ग आणि माणूस यांचा पारलौकिक संबंध अभिव्यक्त करणारी ही कादंबरी आहे. मराठीतील प्रादेशिक कादंबरीचा आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भातच वेगळी आहे. घटनाप्रसंगात, कथानकात ही कादंबरी अडकत नाही..

संदर्भ :

१. 'समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह,' (संपा.) मृणालिनी पाटील, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ., १९८५.
२. 'गो.नी. दांडेकरांची कादंबरी', डॉ. दादा गोरे, प्रतिभा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९८.
३. 'माचीवरला बुधा', गो.नी. दांडेकर, मॅजेस्टिक प्रकाशन, राजेंद्र देवरे, लोणावळा.